## निवडक



**गिरवडे : संत समाज गिरवडे यांच्यातर्फेविनय चोडणकर, कुंदा मांद्रेकर, पुष्कर कवळेकर व डॉ. सत्वशीला शिरोडकर यांचा सत्कार करण्यात आला.**

### संत समाज गिरवडे यांच्यातर्फे साप्ताहिक संत समागम कार्यक्रम

*टीम दैनिक हेराल्ड*

**म्हापसा, दि. ३०** : श्री दत्त पद्मनाभ पीठ संचालित संत समाज गिरवडे यांच्यातर्फे नुकतेच साप्ताहिक संत समागम कार्यक्रम पार पडला. हा कार्यक्रम यजमान आनंद पार्सेकर यांच्या निवासस्थानी संपन्न झाला. यावेळी पुरोहित म्हणून धर्मशिक्षिका संजना पुर्खे, धर्मप्रचारक- आनंद मयेकर, गजर- दयानंद पुर्खे, बाल गुणवृद्धी- कु. मैथिली पुर्खे तसेच महिला सादरीकरण- माधवी पार्सेकर यांनी केले. संत समाजप्रमुख सुनिता बांदोडकर यावेळी उपस्थित होते.

यावेळी पत्रकार भारत बेतकेकर, विनय चोडणकर, कुंदा मांद्रेकर, पुष्कर कवळेकर व डॉ. सत्वशीला शिरोडकर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी आनंद मयेकर म्हणाले की, प्रत्येकाने भगवंतावर विश्वास व सद्गुरूवर निष्ठा ठेवायला हवी. आपली संस्कृती जपणे ही काळाची गरज आहे. आपल्या धर्मानुसार वागायला हवे. सूत्रसंचालन तनुजा हडफडकर, निवेदन राया वायंगणकर, आभार आनंद पार्सेकर यांनी मानले.

---

### पेडणे तालुका गोमंतक मराठा समाजचा ४ रोजी स्नेहमेळावा

*टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. ३०** : पेडणे तालुका गोमंतक मराठा समाज समितीच्या वतीने समाज बांधवांचा वार्षिक स्नेहमेळावा रविवार ४ मे रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत भाग शिक्षणाधिकारी कार्यालय सभागृह पेडणे येथे होणार आहे.

या स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने दहावी व बारावी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या समाजातील विद्यार्थी विद्यार्थिनींचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच गोमंतक मराठा समाज गोवाने आपल्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या अखिल गोवा समाज बांधव क्रिकेट स्पर्धेत पेडणे तालुक्याने उपविजेतेपद प्राप्त केले होते. त्या संघातील खेळाडू आणि व्यवस्थापक यांचाही सन्मान करण्यात येणार आहे. तालुका समितीच्यावतीने भाऊसाहेब बांदोडकर जयंती आणि महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या कथाकथन व वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण आहे यावेळी होणार आहे.

या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून समाजबांधव आणि माजी राज्यसभा खासदार विनय तेंडुलकर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजाचे अध्यक्ष कालिदास खांडेपारकर असतील तर खास निमंत्रित म्हणून निवृत्त प्राचार्य गजानन मांद्रेकर आणि गोमंतक मराठा समाजाच्या केंद्रीय समितीचे सदस्य आणि तालुक्याचे पालक राजेश मांद्रेकर उपस्थित असतील.

समाजातील सर्व बांधवांनी आणि भगिनींनी उपस्थित राहून हा स्नेहमेळावा यशस्वी करावा, असे आवाहन तालुकाध्यक्षासुविधा कोरगावकर, सचिव संकेत शरद मांद्रेकर, खजिनदार नवजीत तोरस्कर आणि तालुका महिला समिती अध्यक्षा सौ अनुराधा कोरगावकर यांनी केले आहे.

---

### हरमल येथे १४ रोजी 'रौद्रशंभो' बालनाट्य

*टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. ३०** : येथील सिद्धेश्वर संस्था व श्री राष्ट्रोळी ब्राह्मण कला निकेतन, कोरकणवाडा यांच्या संयुक्त विद्यमाने व पालये येथील नाट्य लेखक नरेंद्र नाईक लिखित 'रौद्रशंभो' बालनाट्य प्रयोग बुधवार दि. १४ मे रोजी रात्री ८ वाजता सेंट जोसेफ वाझ मल्टिपर्पज हॉल, माऊंट कर्मेल चर्च हरमल येथे होणार आहे.

ह्या बालनाट्यात ५० मुलांचा सहभाग असून नाट्य,नृत्य व संगीताचा अंतर्भाव आहे.तरी बाल व नाट्य रसिकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन श्री सिध्देश्वर व श्री राष्ट्रोळी कला निकेतन संस्थेने केले आहे.

---

### 'लग्नाची वरात ईली घरात' विनोगदी नाटकाचे आज उद्घाटन

*टीम दैनिक हेराल्ड*

**म्हापसा, दि ३०** : गोमंतकातील ज्येष्ठ साहित्यिक तथा नाट्यलेखक प्रकाश धुमाळ यांनी खास महिलासाठी लिहिलेल्या 'लग्नाची वरात ईली घरात' या मालवणी विनोदी नाटकाच्या हस्त लिखिताचा उद्घाटन सोहळा गुरुवार दि १ मे रोजी रात्री ७ वाजता एकतानगर हाऊसिंगबोर्ड म्हापसा येथील श्री साईबाबा मंदिराच्या रोप्य मोहत्सवी व नूतन मूर्तिच्या प्रथम उत्सवा निमित्त आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपसभापती तथा म्हापशाचे आमदार ज्योशुआ डिसोझा, म्हापसा पालिकेच्या नगराध्यक्षा प्रिया मिशाळ, नगरसेवक आशीर्वाद (परेश) खोर्जुवेकर, देवस्थानचे अध्यक्ष रोहित वळवईकर व लेखक प्रकाश धुमाळ उपस्थित असतील.

नंतर या नाटकाचा श्री साईबाबा महीला मंडळ एकतानगर म्हापसा येथील महीला मंडळातर्फे नाटकाचा प्रयोग सादर केला जाईल. या नाटकाचे लेखक - प्रकाश धुमाळ, दिग्दर्शक - गौरव कुबल व प्रणव धुमाळ नेपथ्य, रंगभूषा व पाश्वसंगीत- गौरव कुबल, प्रताप नागवेकर व राया कवळेकर, मनोमय युग मयडे, बार्देश व्यवस्थापक श्री साईनाथ मंदिर एकतानगर हाऊसिंगबोर्ड म्हापसा - यातील कलाकार- मनिषा नाईक, ज्योत्स्ना पार्सेकर, सुषमा आगरवाडेकर, जयंती बेतकर, शर्मिला नाईक, शोभा नाईक, शुभांगी महाजन, राखी गावडे या महिला कलाकार भाग घेतील.

साहित्यिक प्रकाश धुमाळ यांची यापूर्वी कविता संग्रह, कथासग्रह, ललित लेख, एकांकिका संग्रह, देवस्थानवर ऐतिहासिक माहिती पुस्तक, महिला व पुरुषासाठी तीन अंकी नाटके अशी आतापर्यंत १३ पुस्तके प्रकाशित झाली. लग्नाची वरात ईली घरात हे महिलांसाठी लिहिलेले खास मालवणी विनोदी १४ वे नाटक आहे. या नाटकाचा प्रयोग १ मे रोजी होणार आहे. धुमाळ यांच्या साहित्य आणि नाट्य लेखनासाठी गोवा, महाराष्ट्र राज्यातील अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्याचप्रमाणे पत्रकारिता, साहित्य, समाजसेवक म्हणून आंतरराष्ट्रीय पाच पुरस्कार, गोवा, सांगली पुणे, कोल्हापूर व मुंबई येथे प्रसिद्ध मान्यवरांच्या, खासदार, केंद्रीयमंत्री यांच्या हस्ते वितरित करण्यात आले आहेत. कला व संस्कृती कार्यालय गोवा सरकार पणजी गोवा, गोमंतक अकादमी पर्वरी व इतर संस्थानचे पुरस्कार मिळाले आहेत.

# २०२६च्या आशियाई स्पर्धेत क्रिकेटचा समावेश

## चौथ्यांदा समावेश होणार | २०२३ मध्ये भारतीय पुरुष-महिला संघाने सुवर्णपदक जिंकले

**नवी दिल्ली, दि. ३० :**

ऑलिंपिक कौन्सिल ऑफ एशिया (ओसीए) ने जाहीर केले आहे की, २०२६ च्या आशियाई खेळांमध्ये क्रिकेटचा पुन्हा एकदा समावेश करण्यात आला आहे. ओसीएची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २८ एप्रिल रोजी थायलंडमधील बँकॉक येथे झाली, जिथे २०२६ च्या आशियाई खेळांच्या कार्यक्रमात क्रिकेट ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

२० वी आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर दरम्यान जपानमधील ऐची आणि नागोया येथे होणार आहेत. यामध्ये सुमारे १५,००० खेळाडू सहभागी होतील. ओसीएने सांगितले की, क्रीडा कार्यक्रमात क्रिकेट आणि मिश्र मार्शल आर्ट्स या दोन्ही खेळांना औपचारिक मान्यता देण्यात आली आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटचा समावेश चौथ्यांदा होणार आहे. २०१० च्या ग्वांगझू आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटचा पहिलाच समावेश झाला. नंतर ते इंचॉन २०१४ मध्ये परत आले, जरी या सामन्यांना आंतरराष्ट्रीय दर्जा देण्यात आला नव्हता. २०२२ मध्ये चीनच्या हांगझोऊ येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारत विजेता ठरला होता. २०२६ मध्ये क्रिकेटचा समावेश चौथ्यांदा या खेळांमध्ये होणार आहे.

२०२३ मध्ये खेळल्या गेलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटला तिसऱ्यांदा स्थान मिळाले. यापूर्वी २०१० आणि २०१४ मध्ये त्याचा समावेश करण्यात आला होता. २०२२ मध्ये खेळल्या गेलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय क्रिकेट संघाने सुवर्णपदक जिंकले होते, हा फोटो त्यावेळचा आहे.



२०२३ मध्ये खेळल्या गेलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटला तिसऱ्यांदा स्थान मिळाले. यापूर्वी २०१० आणि २०१४ मध्ये त्याचा समावेश करण्यात आला होता. २०२२ मध्ये खेळल्या गेलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय क्रिकेट संघाने सुवर्णपदक जिंकले होते, हा फोटो त्यावेळचा आहे.

इंचॉन २०१४ नंतर, जकार्ता २०१८ मधून आशियाई खेळ वगळण्यात आले. त्यानंतर २०२२ च्या हांग्झो येथे क्रिकेट परतले, यावेळी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (खउउ) सर्व सामन्यांना आंतरराष्ट्रीय दर्जा दिला.

हांगझोऊ २०२२ मध्ये भारताने पुरुष आणि महिला दोन्ही स्पर्धांमध्ये सुवर्णपदके जिंकली. अफगाणिस्तान आणि श्रीलंकेने पुरुष आणि महिलांच्या स्पर्धांमध्ये रौप्य पदके जिंकली, तर बांगलादेशने दोन्हीमध्ये कांस्यपदके जिंकली. २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धांचे सामने ऐची येथे होणार आहेत.

# हरमल येथे भगवान परशुराम जन्मोत्सव उत्साहात



**हरमल : समुद्रकिनाऱ्यावरून टाळांच्या गजरात मिरवणूक महिलांचा समावेश.**

*टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. ३०** : गोवा व कोकण भगवान श्री परशुराम यांनी निर्मिली होती. त्या समुद्रकिनारी परशुराम टेकडीवर भगवान श्री परशुराम जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर व सौ सिध्दी जीत आरोलकर यांनी पादुकांची पूजा, आरती केली. यावेळी सौ. आस्था व अविनाश सुभाष कोचरेकर यांनी पालखी व श्रींच्या तसबिरीची पूजा केली.

या मिरवणुकीच्या अग्रभागी सार्थक कोचरेकर यांनी भगवान श्री परशुरामाची वेशभूषा साकारली होती. गोव्यात हरमल गावात भगवान श्री परशुराम यांनी मानवी कल्याणासाठी यज्ञविधी केला व त्या यज्ञातून साकारलेला भास्माचा डोंगर म्हणजे परशुराम टेकडी. अशा पवित्र स्थानात अनेकदा येणे झाले व आपण भगवान परशुरामाचा भक्त असल्याने पुढील जन्मोत्सवापूर्वी मांद्रेत भव्य पुतळा उभारण्यात येईल. भाविकांनी साथ द्यावी, असे भावपूर्ण उद्गार मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर यांनी केले.

परशुराम भगवान हा विष्णूचा सहावा अवतार आहे.क्षत्रियांचा संहार केल्यानंतर भूमी रक्ताने माखली होती, त्या भूमी ऐवजी दुसरी भूमी निर्माण केली. त्यावेळी समुद्राला आवाहन केले की आपणास रक्त थेंब नसलेली भूमी पाहिजे आहे.मात्र समुद्राने नाही म्हटले,, परीक्षा घेतली व त्यावेळी भगवान परशुरामाने रागाने बाण मारून ही समुद्राला भाग पाडले व भूमी निर्माण केली, त्याला कोकण व गोवा भूमी मनली जाते. या भूमीचा जनक भगवान श्री परशुराम आहे. भगवान परशुरामाने आपला शरीर भस्मसात केले व आत्मा लिंगरुपी समुद्रात असल्याचे अख्यायिका असल्याचे मडगाव येथील जयेश नाईक यांनी व्यक्त केले. शेवटी आरती व प्रसाद वाटप केले.विनायक चारी यांनी आभार मानले.यावेळी मडगाव व हरमलचे भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री नारायणदेव महिला मंडळाने दिंडी व टाळाच्या गजरात मिरवणूकित भाग घेतला.

# एकाच सामन्यात दोन कर्णधार मैदानाबाहेर!

**कोलकाता-दिल्लीवर संकटाची चाहूल**



**नवी दिल्ली, दि. ३० :**

आयपीएल २०२५ च्या ४८ व्या सामन्यात, दिल्ली कॅपिटल्सला त्यांच्या घरच्या मैदानावर अरुण जेटली स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध पराभव पत्करावा लागला. या सामन्यादरम्यान, असे काहीतरी घडले ज्यामुळे दोन्ही संघांच्या चाहत्यांची नाडी उंचावली. सामन्यात दोन्ही संघांचे कर्णधार जखमी झाले. अक्षर पटेलसह अजिंक्य रहाणेलाही दुखापत झाली. सामन्यानंतर, आरोग्य अपडेट समोर आला ज्यामध्ये दुखापतीची सध्याची स्थिती सांगितली गेली.

अक्षर पटेलने सामन्यादरम्यान झालेल्या दुखापतीबद्दल माहिती दिली. डावखुरा अष्टपैलू खेळाडू क्षेत्ररक्षण करताना त्याच्या बोटाला दुखापत झाली आणि नंतर त्याला वेदना होत असताना फलंदाजी करणे कठीण झाले, तरीही त्याने २३ चेंडूत ४३ धावा केल्या. २०५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना धावफलक हलत राहावा यासाठी त्यांनी गोलंदाजांवर हल्ला करण्याचा आणि चौकार मारण्याचा निर्णय घेतला. तथापि, शेवटी त्याच्या संघाला १४ धावांनी सामना गमवावा लागला.

डावाच्या १८ व्या षटकात, रोवमन पॉवेलने चेंडू मिडविकेटला जोरदार मारला. अक्षरने धाव वाचवण्यासाठी डायव्ह केला पण त्यादरम्यान त्याच्या बोटाला दुखापत झाली. फिजिओ ताबडतोब त्याची तपासणी करण्यासाठी आला आणि अक्षर ताबडतोब पुढील वैद्यकीय उपचारांसाठी मैदानाबाहेर गेला. वेदना असूनही, कर्णधाराने त्याच्या संघाला पुढे नेले आणि फलंदाजीसाठी आला. त्याने ४ चौकार आणि ३ षटकार मारले. अक्षरने २३ चेंडूत ४३ धावा केल्या.

सामन्यानंतर त्याने त्याच्या दुखापतीबद्दल सविस्तर सांगितले आणि सांगितले की फलंदाजी करताना त्याला वेदना होत होत्या. तथापि, पुढील सामन्यात ते बरे होतील अशी अपेक्षा आहे. अक्षरने ब्रॉडकास्टर्सना सांगितले, बॉल थांबवण्यासाठी सराव विकेटवर डाईव्ह मारल्याने माझी त्वचा फाटली. जेव्हा जेव्हा मी शॉट खेळण्याचा प्रयत्न केला तेव्हा बॅटचे हँडल सोलले आणि त्वचेवर घासले आणि ते दुखत होते, परंतु चांगली गोष्ट म्हणजे ३-४ दिवसांचा ब्रेक आहे आणि आशा आहे की मी बरा होईन.

# दुसरा एकदिवसीय सामना भारतीय महिला संघाने जिंकला

## दक्षिण आफ्रिकेचा १५ धावांनी पराभव : प्रतिका रावलचे सलग सहावे अर्धशतक

**कोलंबो, दि. ३० :**

श्रीलंकेत सुरू असलेल्या एकदिवसीय तिरंगी मालिकेतील दुसरा एकदिवसीय सामनाही भारतीय महिला संघाने जिंकला. मंगळवारी कोलंबोमध्ये संघाने दक्षिण आफ्रिकेचा १५ धावांनी पराभव केला. सलामीवीर प्रतिका रावलने सलग सहाव्या एकदिवसीय सामन्यात अर्धशतक झळकावले. तर स्नेह राणाने ५ विकेट्स घेतल्या.

आर प्रेमदासा स्टेडियमवर भारतीय महिला संघाने फलंदाजीचा निर्णय घेतला. संघाने ६ विकेट्स गमावून २७६ धावा केल्या. ६ फलंदाजांनी २० पेक्षा जास्त धावा केल्या. प्रत्युत्तरात, दक्षिण आफ्रिकेचा महिला संघ ४९.२ षटकांत २६१ धावांवर बाद झाला. ताजमिन ब्रिट्झने शतक झळकावले, पण तिला तिच्या संघाला विजय मिळवून देता आला नाही.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेणाऱ्या भारतीय महिला संघाला स्मृती मंधाना आणि



प्रतिका रावल यांनी चांगली सुरुवात करून दिली. दोघांनीही ८३ धावांची भागीदारी केली. मंधाना ३६ धावा करून बाद झाली. तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या हरलीन देओलने प्रतिकासोबत ६८ धावा जोडल्या. प्रतिका ७८ धावांवर बाद झाली, एकदिवसीय सामन्यांमधील तिचे सलग सहावे अर्धशतक. तिच्या पाठोपाठ हरलीनही २९ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली.

कर्णधार हरमनप्रीत कौर चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आली. तिने जेमिमासोबत ५९ धावांची भागीदारी करून संघाला २०० धावांच्या पुढे नेले. जेमिमा ४१ धावा करून बाद झाली. तिच्यानंतर, यष्टिरक्षक रिचा घोषने १४ चेंडूत २४ धावांची खेळी केली. शेवटी, दीप्ती शर्माने ९ धावा आणि काशवी गौतमने ५ धावा केल्या.कॅप्टन हरमन शेवटपर्यंत उभी राहिली. तिने इतर फलंदाजांसह संघाची धावसंख्या ६ गडी गमावून २७६ पर्यंत नेली. हरमन ४१ धावा करून नाबाद राहिली. दक्षिण आफ्रिकेकडून नॉनकुलुलेको मलाबाने २ बळी घेतले. अयाबोंगा खाका, मसाबता क्लास, नदिन डी क्लर्क आणि अँरी डेर्कसेन यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

२७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेच्या सलामीवीरांनी शतकी भागीदारी केली. दोघांनीही २७.५ षटकांत १४० धावा जोडल्या. कर्णधार लॉरा वोल्वार्ड ४३ धावा काढून बाद झाली, तिला दीप्ती शर्माने एलबीडब्ल्यू केले. तिच्यानंतर, लारा गुडॉल फक्त ९ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली आणि कराबा मेसो फक्त ७ धावा करून परतली.

ताजमिन ब्रिट्झने तिच्या एकदिवसीय कारकिर्दीतील तिसरे शतक झळकावले. शतक ठोकल्यानंतर, ती रिटायर्ड हर्ट झाली आणि पॅव्हेलियनमध्ये परतली. तिच्या जागी सून लुस फलंदाजीला आली. लुसने क्लो ट्रायॉनसोबत २६ धावा जोडल्या, पण ती स्वतः २८ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली.

# हॉलिबॉल स्पर्धेत श्याम वॉरियर्स संघ विजेता



**उसप भटवाडी : येथील हॉलिबॉल लीग स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या संघाबरोबर पंच दिलीप वरक (मध्यभागी) व क्लब सदस्य.**

*टीम दैनिक हेराल्ड*

**साळ, दि. ३०** : लाटंबार्से पंचायत क्षेत्रातील उसप भटवाडी येथील भटवाडी क्रीडा मंडळाने स्व. श्रीराम गांवकर यांच्या स्मरणार्थ भटवाडी प्रीमियर लीग हॉलिबॉल स्पर्धेचे आयोजन केले होते .

या स्पर्धेत श्याम वॉरियर्स संघ विजेता तर सुभाष शाम संघ उपविजेता ठरला. या स्पर्धेत उत्कृष्ट स्मॅशर - साईश गावकर, उत्कृष्ट लिफ्टर - अंता गावकर, उत्कृष्ट डिफेंडर - गौतम गावकर, अपकमिंग प्लेयर - कृष्णा बाजारी, लीग स्पर्धेतील स्पर्धा वीर - गौरेश गावकर हे खेळाडू वैयक्तिक बक्षिसांचे मानकरी ठरले.

लाटंबार्से ग्रामपंचायतचे पंच दिलीप वरक यांच्या हस्ते विजेत्या संघांना चषक व खेळाडूंना बक्षिसे प्रदान करण्यात आलीत.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २३८ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 238 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .